| Publication | Navshakti | Language | Marathi |
| --- | --- | --- | --- |
| News | 2nd Phase of Sai Nisarg at Shahpur Launched | Date | 14th January 2011 |
| Edition | Mumbai | Page No. | 11 |

नवशक्ति
मुंबई, शुक्रवार १४ जानेवारी २०११ ११

# ड्रिम्ज रिअल्टीचे वाजवी दरात प्लॉट

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - बांधकाम कंपनी ड्रिम्झ रिअल्टीने शहापूर येथे साई निसर्ग या आपल्या प्रकल्पातील दुसऱ्या टप्प्यात बंगल्यांसाठीचे प्लॉटस् विक्रीस काढले आहेत. कंपनीने १६२५ चौ.फूट ते ४ हजार चौ.फूट आकाराचे प्लॉट ३२५ रुपये प्रति चौरस फूट दराने मिळणार आहेत.

मुंबई - नाशिक महामार्गापासून १० मिनिटांच्या आणि दादरपासून ९० मिनिटांच्या अंतरावर ड्रिम्झचा साई निसर्ग प्रकल्प आहे. शहापूरच्या आल्हाददायक नैसर्गिक वातावरणात वसलेल्या साई निसर्गला राज्य शासनाने पर्यटनस्थळ म्हणून घोषीत केले आहे.

प्रसिद्ध माहुलगड आणि जैन मानस सरोवराच्या जवळ वसलेले हे ठिकाण टेकड्यांनी वेढलेले आहे. स्थानिक पर्यावरणाला कसलाही धक्का न लावता याठिकाणी प्लॉट पाडण्यात आलेले आहेत.